जावक क्र. ३५/२०२६
जयगड सागरी पोलीस ठाणे
दिनांक ०२/०१/२०२६

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस अधिक्षक कार्यालय रत्नागिरी

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): रत्नागिरी **P.S.**(ठाणे): जयगड

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0001 **Year** (वर्ष): 2026

Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 02/01/2026 08:50

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): गुरूवार **Date From** (दिनांक पासून): 01/01/2026

Time Period (कालावधी): पहर 5 **Date To** (दिनांक पर्यंत): 01/01/2026

Time From (वेळेपासून): 14:02 बजे

Time To (वेळेपर्यंत): 14:27 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

Date (दिनांक): 02/01/2026 **Time** (वेळ): 08:50 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ):

Entry No. (नोंद क्र.): 009

Date & Time (दिनांक आणि वेळ): 02/01/2026 08:50 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

दक्षिण, 20 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): ग्रामपंचाय चाफे तलाठी कार्यालय, चाफे,रत्नागिरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मच्छिंद्र बाळसिंग जाधव

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : बाळसिंग जाधव

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1984

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	लाचलुचपतप्रतिबंधक कार्या,रत्ना,रत्नागिरी,रत्नागिरी,रत्नागिरी शहर, रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	लाचलुचपतप्रतिबंधक कार्या,रत्ना,रत्नागिरी,रत्नागिरी,रत्नागिरी शहर, रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9870474535

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	बजरंग दत्तात्रय चव्हाण			1. शांतीनगर,नाचणे ,रत्नागिरी, जयगड ,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
1	नाणे आणि चलन	भारतीय- रुपया	500 रू दराच्या 20 चलनी नोटा	10,000.00

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

10,000.00

11.Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत):

फिर्याद दिनांक 02/01/2026

मी मच्छिंद्र बाळसिंग जाधव, वय-42 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी, सरकारतर्फे फिर्याद लिहून देतो की,

मी, ऑक्टोबर 2024 पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी कार्यालयात पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

मुळ तक्रारदार श्री. योगेश बाळू गोताड रा.मु.पो. आगरनरळ, कुणबी वाडी, ता. जि. रत्नागिरी यांनी दिनांक 31/12/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय रत्नागिरी याठिकाणी समक्ष हजर राहुन लोकसेवकाविरुध्द लाच रक्कमेच्या मागणीची तक्रार असल्याचे सांगुन स्वःहस्ताक्षरातील लेखी तक्रारी अर्ज दिला होता. त्या अनुषंगाने आम्ही दिनांक 01/01/2026 रोजी विभाग नियंत्रक, महाराश्ट्र राज्य परिवहन महामंडळ, रत्नागिरी यांना पत्र देवुन दिनांक 01/01/2026 रोजीकरीता तात्काळ पंच साक्षीदार 1) आदित्य अषोक जाधव, वय 27 वर्षे, व्यवसाय- नोकरी, लिपीक, राज्य परिवहन महामंडळ, रत्नागिरी ता. जि. रत्नागिरी सध्या रा. टिळक आळी, जनार्दन प्लाझा, बी/204, मुळ रा. वाकेड, ता. लांजा, जि. रत्नागिरी व 2) राहुल सुनिल माने, वय 35 वर्षे, व्यवसाय- नोकरी, लिपीक, राज्य परिवहन महामंडळ, रत्नागिरी ता. जि. रत्नागिरी सध्या रा.एस.टी. कॉलनी, रुम नं. 00, माळनाका, ता.जि. रत्नागिरी, मुळ रा. मु.पो.राजस्व नगर, सोलापुर शहर, सी/171, 413004 यांना उपलब्ध करुन घेतले. त्यांना दि. 01/01/2026 रोजी सकाळी 10.15 वाजता अँन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयात हजर राहण्याच्या सुचना दिल्या.

दिलेल्या सुचनेप्रमाणे पंच दिनांक 01/01/2026 रोजी 10.30 वाजता अँन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयात हजर झाले. त्यावेळी आम्ही पंच यांना तक्रारदार यांची लोकसेवकारुध्द लाच मागणीची तक्रार असल्याचे सांगुन तक्रारदार गोताड यांचा तक्रारी अर्ज त्यांना वाचण्यास दिला. तक्रारदार यांनी लोकसेवकाविरुध्द दिलेल्या लेखी तक्रार अर्जातील मजकूर पुढीलप्रमाणे-मी वरील प्रमाणे राहणार असुन मौजे आगरनरळ ता. जि. रत्नागिरी येथील स.नं.67/9/2 या जागेच्या एकुण क्षेत्रापैकी 10 गुंठे बिनषेती क्षेत्र श्री. दामोदर लक्ष्मण ठोंबरे रा. मु.पो. आगरनरळ यांचेकडुन खरेदीखताद्वारे खरेदी केलेले आहे. मी खरेदी केलेल्या मिळकतीच्या सात बारा उताऱ्यामध्ये फेरफार होवुन माझे नाव दाखल होण्याकरीता मी तलाठी सजा चाफे यांची दिनांक 09/10/2025 रोजी तलाठी कार्यालय चाफे याठिकाणी भेट घेवुन माझे नाव दाखल करुन घेण्याबाबतचा विहीत नमुन्यातील अर्ज सादर केला. त्यावेळी तलाठी श्री बजरंग चव्हाण यांनी सदरचा अर्ज माझे कडुन स्विकारला व अर्जाप्रमाणे फेरफार नोंद करुन माझे नाव दाखल केलेला सात बारा उतारा व फेरफारची प्रत देण्याकरीता तलाठी चव्हाण यांनी माझेकडे 10,000/- रुपयांची मागणी केलेली होती. त्यानंतर मी वारंवार फोनद्वारे माझे कामाचा पाठपुरावा केला असता मागणी केलेली रक्कम हि लाच रक्कम असुन लाच रक्कम दिल्याशिवाय माझे काम होणार नाही अशी माझी खात्री झाल्याने तसेच मला सरकारी कामाकरीता त्यांना लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी आज दिनांक 31/12/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय रत्नागिरी येथे समक्ष हजर राहुन माझी लेखी तक्रार लिहुन देत आहे. माझ्यात व त्यांच्यात कोणताही आर्थिक व्यवहार आणि देवाण घेवाण नाही. तसेच माझे त्यांचेसोबत कोणतेही वादविवाद नाहीत. तरी तलाठी सजा चाफे येथील तलाठी बजरंग चव्हाण यांचेवर कारवाई होणेस विनंती आहे. असे नमुद आहे. तक्रारदार यांचा तक्रार अर्ज व तक्रारदार यांनी तक्रार अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे पाहिली असता त्यामध्ये तक्रारदार गोताड यांचे खरेदीखत व बिनशेती आदेशाची छायांकीत प्रत आहे. सदर तक्रारीवर व सोबतच्या कागदपत्रांवर आम्ही व पंचानी सहया करुन ती तक्रार ताब्यात घेण्यात आली.

त्यानंतर 11.00 वाजताच्या सुमारास आम्ही, पंच व एसीबी स्टाफ, आवश्यक त्या साधनसामुग्रीसह खाजगी वाहनाने अँन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयातुन निघुन मारुती मंदीर - मिरजोळे - करबुडे फाटा मार्गे मौजे

चाफे येथील निवेंडी फाटा येथे आलो. तेथे आल्यानंतर तक्रारदार श्री. योगेश गोताड यांना फोनद्वारे संपर्क साधला असता 11.45 वाजताचे सुमारास ते त्यांचे मोटारसायकलने निवेंडी फाटा येथील निर्जनस्थळी आले. तथे तक्रारदार यांनी आपली ओळख योगेश बाळु गोताड,वय 31 वर्शे, रा. आगरनरळ, कुणबी वाडी, ता. जि. रत्नागिरी अशी सांगितली. आम्ही तक्रारदार यांना पोलीस स्टाफ व पंच यांची ओळख करुन दिली. आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे तक्रारदार गोताड यांनी त्यांचे तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगितली. सदर तक्रारीची पडताळणी करणे आवष्यक असल्याचे तक्रारदार व पंचाना सांगण्यात आले.

सदर तक्रारीची दिनांक 01/01/2026 रोजी तक्रारदार गोताड व पंच क्र 1 जाधव यांना ग्रामपंचायत कार्यालय चाफे येथील सजा चाफे तलाठी कार्यालयात पाठवून समक्ष भेट घेवून पडताळणी करण्यात आली. पडताळणी कारवाई दरम्यान डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तक्रारदार गोताड यांचे शर्टाच्या आत बनियनमध्ये लपविण्यात आला. त्यावेळी तक्रारदार गोताड व पंच नं. 1 जाधव असे मोटार सायकलने ग्रामपंचायत चाफे याठिकाणी गेले. त्यानंतर ग्रामपंचायत आवारात मोटार सायकल पार्क केल्यानंतर ते ग्रामपंचायत कार्यालयाच्या शेजारी असणा-या तलाठी कार्यालयात गेले त्यावेळी पंच नं. 1 जाधव तलाठी कार्यालयाच्या बाहेर दरवाज्यामध्ये थांबून होते. त्यावेळी तक्रारदार गोताड यांनी 67/9 या जमिनीच्या सातबारा उताऱ्याबाबत चैकशी केली. त्यावेळी लोकसेवक चव्हाण यांनी 67/9 ब का? असे विचारले.... त्यावेळी त्यांनी 10 गुठयांच खरेदीखत दिलं असे सांगुन आपले नाव योगेश बाळु गोताड असे सांगितले.... त्यावेळी लोकसेवक चव्हाण यांनी त्यांचे लॅपटॉप मध्ये तक्रारदार गोताड यांचा सातबारा ओपन केला. त्यावेळी त्यांचेत सातबाऱ्या वरील क्षेत्रासंबंधित चर्चा सुरु होती. त्यादरम्यान लोकसेवक चव्हाण यांनी फेरफार देताय त्याचा? असे विचारले असता ... तक्रारदार गोताड यांनी फेरफार पण दया असे सांगितले... त्यानंतर त्यांचेमध्ये इतर जमिनीच्या सातबारा संबंधित चर्चा सुरु होती. त्यानतर लोकसेवक चव्हाण यांनी तक्रारदार यांचा सातबारा उतारा व फेरफार याची प्रिंट काढुन त्याचे 30/- रु. देण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी 30/- रु. दिले. त्यानंतर लोकसेवक चव्हाण यांनी तक्रारदार यांना 2 मिनीटे आलो... असे म्हणुन कार्यालयाच्या बाहेर येण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार कार्यालयाच्या बाहेर येवुन थांबले त्यांचे पाठोपाठ लोकसेवक चव्हाण कार्यालयाच्या बाहेर येवुन तक्रारदार यांचे जवळ गेले. त्यावेळी पंच नं. 1 जाधव त्यांचे आसपास थांबुन होते. त्यावेळी लोकसेवक चव्हाण यांनी होत असतं मग मी केलं असतं... असे म्हणुन हाताच्या बोटांनी पैशाबाबत खुणावले... त्यावेळी तक्रारदार यांनी किती दयायचे तुम्हांला असे विचारले असता ... लोकसेवक चव्हाण यांनी आता काय तुम्ही देताय सांगा... असे म्हणुन ....मी काय मस्त पन्नास सांगेन...तुम्ही करणार आहात थोडं...? असे त्यांना सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी बोला किती... असे लोकसेवक चव्हाण यांना विचारले असता.. त्यांनी दहा दया... असे सांगितले. त्यावेळी त्यांनी दहा हजार रुपये? असे लोकसेवक चव्हाण यांना विचारले असता... लोकसेवक यांनी हम असे बोलून होकार दिला ... असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी काय कमी करा... असे विचारले असता लोकसेवक चव्हाण यांनी बघु दाखवा कागद असे म्हणुन तक्रारदार गोताड यांचे बिनषेती आदेष पाहिले. व तुमचं दहा गुठयाचं खरेदीखत नोंद झालय अस त्यांना सांगितले. त्यावेळी तक्रार यांनी दहा मध्ये काही कमी करा... मी घेवुन येतो पटकन.... कमी करा काहीतरी... दहा जास्त होतात... असे सांगितले असता.. लोकसेवक चव्हाण यांनी मी सांगितले ते बरोबर आहे... काम तुमचं पुर्ण केलंय... असे सांगितले असता तक्रारदार यांनी ठिक आहे आणतो जावुन ... असे सांगितले असता ... लोकसेवक चव्हाण यांनी त्यांचे ताब्यातील तक्रारदार यांचा सातबारा उतारा व फेरफार या लोकसेवक चव्हाण यांची सही व शिक्का असलेल्या मुळ प्रती तक्रारदार यांचे ताब्यात दिल्या.

त्यामुळे लोकसेवक चव्हाण यांनी तक्रारदार गोताड यांनी दिलेल्या अर्जाप्रमाणे फेरफार नोंद करुन तक्रारदार गोताड यांचे नाव दाखल केलेला सातबारा उतारा व फेरफारची प्रत देण्याकरीता तक्रारदार यांचेकडे 10,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली. लोकसेवक यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेबाबत तक्रारदार यांनी कबुली दिल्यानंतर तक्रारदार यांचे नाव असलेला सातबारा उतारा व फेरफार ची प्रत लोकसेवक चव्हाण यांनी त्यांचे सही शिक्यानिशी तक्रारदार गोताड यांचे ताब्यात देवुन मागणी केलेली लाच रक्कम लगेचच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निश्पन्न झाले.

पडताळणीमध्ये स्पष्ट झालेनुसार दिनांक 01/01/2026 रोजी लोकसेविकाविरुध्द लागलीच लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले. दरम्यान सापळापुर्व कारवाई दरम्यान पोकॉ/पवार यांनी तक्रारदार गोताड व पंचांना अल्ट्राव्हायोलेट दिवा व अँन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म व प्रात्यक्षिक खाजगी वाहनामध्ये दाखविले. तक्रारदार गोताड यांनी लाच रक्कम म्हणून हजर केलेल्या 10,000/- रुपये (त्यामध्ये 500 रुपये दराच्या 20 भारतीय चलनी नोटा) रक्कमेस पोकॉ/पवार यांनी अँन्थ्रासिन पावडर लावून त्या नोटांची घडी करुन तक्रारदार गोताड यांचे शर्टाच्या डाव्या बाजुच्या खिषात ठेवली. त्यानंतर पोकॉ/पवार यांना सापळा कारवाईतुन वगळण्यात आले. सापळा कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार, पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांना योग्य त्या सुचना देण्यात आल्या.

सापळा कारवाई दरम्यान डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तक्रारदार जाधव यांचे शर्टाच्या आत बनियनमध्ये लपविण्यात आला. तक्रारदार गोताड व पंच नं. 1 जाधव असे तक्रारदार यांचे मोटार सायकलने ग्रामपंचायत चाफे याठिकाणी गेले. ग्रामपंचायतीचे आवारामध्ये गाडी पार्क करुन तक्रारदार गोताड तलाठी कार्यालयामध्ये गेले. त्यावेळी लोकसेवक चव्हाण जेवत असल्याने तक्रारदार गोताड कार्यालयाचे बाहेर येवुन थांबले. त्यावेळी पंच नं. 1 जाधव हे देखील कार्यालयाचे बाहेर थांबुन होते. लोकसेवक चव्हाण यांचे जेवण झाल्यानंतर तक्रारदार गोताड हे तलाठी कार्यालयात गेले त्यावेळी पंच नं.1 जाधव हे दरवाज्यामध्ये थांबुन होते. त्यावेळी लोकसेवक चव्हाण यांनी त्यांना जेवलात का ? असे विचारले असता तक्रारदार गोताड यांनी नाय.. जाकादेवीत गेलो होतो... जरा काम करायचं.. असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक चव्हाण यांनी हाताच्या बोटांनी पैशाबाबत खुणावले असता... तक्रारदार गोताड यांनी त्यांचे शर्टाच्या डाव्या खिशातील रक्कम लाच रक्कम काढुन लोकसेवक चव्हाण यांचे समोर धरली. व मोजुन घ्या... काही तरी कमी केले असते ना ... दहा मध्ये जरा... असे बोलले. त्यावेळी लोकसेवक चव्हाण यांनी सदरची लाच रक्कम उजव्या हाताने स्वीकारुन पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन नाही... ते केलं ... होत नव्हते सर... असे सांगितले. त्यानंतर त्यांचेमध्ये सातबारा उतारा याबाबत चर्चा सुरु होती. त्यानंतर तक्रारदार गोताड तलाठी कार्यालयाच्या बाहेर आले. व सापळा पथकास लोकसेवक चव्हाण यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा म्हणुन त्यांचा डावा हात त्यांचे डोक्यावरुन वारंवार फिरविला अशी हकीकत सांगितली. सदरचा इशारा मिळताच आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पथक यांनी सदर कार्यालयात जावून लोकसेवक चव्हाण यांना पंचासमक्ष दिनांक 01/01/2025 रोजी 14.32 वा. रंगेहात पकडण्यात आले. त्यांचेकडून लाचेची रक्कम लागलीच हस्तगत करुन तपासकामी जप्त करण्यात आली आहे. त्याबाबतचा सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा असा एकत्रित पंचनामा करण्यात आला आहे.

तरी लोकसेवक बजरंग दत्तात्रय चव्हाण, वय 51 वर्षे, व्यवसाय - नोकरी ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) सजा चाफे सध्या राहणार शांतीनगर, नाचणे मुळ रा. मु.पो. कोणेगाव, ता.कराड, जि. सातारा, मोबा. नं. 9922798224 (वर्ग 3) यांनी लोकसेवक या नात्याने आपले पदाचा व मिळालेल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन कायदेशीर परिश्रमिकाखेरीज अन्य पारितोषण म्हणून तक्रारदार योगेश बाळु गोताड यांनी मौजे आगरनरळ येथील खरेदीखताद्वारे खरेदी केलेल्या मिळकतीच्या सात बारा उताऱ्यावर फेरफार नोंद करुन तसा सातबार उतार व फेरफार प्रत देण्याकरीता दिनांक 01/01/2026 रोजी 12.31 ते 12.49 वाजताचे मुदतीत तक्रारदार गोताड यांचेकडे 10,000/- रुपये लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन मागणी केलेली लाच रक्कम लगेचच स्विकारण्याचे मान्य केले. त्यानुसार मागणी केलेली लाच रक्कम 10,000/- रुपये लोकसेवक बजरंग चव्हाण यांनी दिनांक 01/01/2026 रोजी 14.02 ते 14.27 वाजताचे मुदतीत ग्रामपंचायत चाफे येथील तलाठी कार्यालयामध्ये पंच जाधव यांचे समक्ष स्विकारुन स्वतःचा सांपत्तीक फायदा करुन घेतला म्हणुन माझी लोकसेवक बजरंग दत्तात्रय चव्हाण यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 (सुधारणा सन 2018) चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Sanjay Raosaheb Patil(I (Inspector)) / DGPSRPM8615 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): **No.**(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Sanjay Raosaheb Pa
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): DGPSRPM8615

(पोलीस ठाणे अमलदार)
जयगड सागरी पोलीस ठाणे
ता.जि.रत्नागिरी, राज्य महाराष्ट्र